| MHPU100000552023 | **<u>विलास बबन आभाणे</u>**<br>**<u>वि.</u>**<br>**<u>पिं. चिं. मनपा व इतर</u>** |
| --- | --- |

## <u>नि.दि.दा.क्र.०७/२०२३ मधील नि. क्र. ४८ वरील आदेश.</u>

अर्जाचे अवलोकन केले. प्रतिवादींचे म्हणणे मागविले. प्रतिवादी क्र. ६ यांच्या वकीलांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जांवर दिले. प्रतिवादींच्या वकीलांचे म्हणणे ऐकले.

२. प्रस्तुतचा दावा ठराव व निरंतर मनाईसाठी केलेला आहे. प्रस्तुत अर्जान्वये अर्जदार हे दाव्याच्या अनुषंगाने काही दस्त दाखल करु पाहत आहेत. तसेच, सदरहु कागदपत्रांना निशाणी देण्यात येवून ती पुराव्यात वाचण्यात यावी, अशी सुध्दा त्यांनी मागणी केली. दाव्याचे स्वरुप तसेच दस्तांचे स्वरुप बघता सदर दस्त हे उभयपक्षातील वादाच्या अनुषंगाने असल्याचे दिसुन येते. सदर कागदपत्र दाखल करण्यास परवानगी दिल्यास वाद गुणावगुणावर निवारण होण्यास मदतच होणार आहे. तसेच, त्यांना निशाणी क्रमांक व ते शाबित करण्याची जबाबदारी ही वादीवर आहे. त्याकरीता, पुरावा आवश्यक असुन संबंधित साक्षीदाराच्या साक्षीमध्ये त्यांना निशाणी क्रमांक देण्यात येईल व पुराव्यामध्ये वाचण्यात येईल. दस्त दाखल केले म्हणजे ते सिध्द झाले, असे होत नाही. करिता, प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करणे न्यायसंगत वाटते. परिणामी, खालील आदेश पारित करित आहे.

# <u>आदेश</u>

१. निशाणी क्र. ४८ वरील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो व वादीला कागदपत्रे फक्त दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/-

आकुर्डी, पुणे. (व्ही. एस. डामरे)

दिनांक ११/०८/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, आकुर्डी, पुणे.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Gaurav A. Bobade (Grade III) |
| Court Name | :- | Shri. V. S. Damare,<br>Civil Judge Junior Division, (P.C.M.C.),<br>Court, Akurdi, Pune. |
| Date | :- | 11/08/2026. |
| Order signed by<br>presiding officer on | :- | 11/08/2026. |
| Order uploaded on | :- | 11/08/2026. |